<u>सं. फौ. ख. क्र. ३२८/२०२४</u> निशाणी क्र. ७ पुढे सुरु...

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – प्रशांत पांडुरंग पोहरे

वय – ३७ वर्षे व्यवसाय – चहा कॅन्टीन

पत्ता – रा. उरळ, ता. बाळापुर जि. अकोला.

**<u>सरकार तर्फे सरकारी वकिल गैरहजर, आरोपीच्या वकीलाकडुन कोणतीही हरकत नसल्याने न्यायालया मार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी दि.२०.०४.२०२४ रोजी माझ्या उरळ पोलीस स्टेशन शेजारी असलेल्या चहाच्या कॅन्टीनमध्ये होतो. त्या दिवशी मला पोलीसांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्याकरीता अंत्री मलकापुर येथे बोलविले होते असे काही घडले नाही. पोलीसांनी माझ्या समक्ष आरोपी वासुदेव डाबेराव याच्या ताब्यातुन व राहते घरामधुन एका प्लास्टीक कॅनमध्ये १० लिटर गावठी हातभट्टीची दारु जप्त केली व त्याचा पंचनामा केला असे काही घडले नाही. आता मला दि. २०.०४.२०२४ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर अ.क्र. १ वर माझी सही असुन त्यातील मजकुर मला माहित नाही. त्यास ओळखपुरती **नि.क्र. १०** देण्यात येत आहे. आता मला दि. २०.०४.२०२४ रोजीचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला त्यावर अ.क्र. २ वर माझी सही असुन त्यातील मजकुर मला माहित नाही. त्यास ओळखपुरती **नि.क्र. ११** देण्यात येत आहे.

**(साक्षीदार अभियोग पक्षास पुरक साक्ष देत नसल्याकारणाने त्याचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येत आहे.)**

२. आता मला घटनास्थळ पंचनाम्या मधील अधोरेखांकित भाग अ वाचून दाखविला तो मजकूर मला माहित नसून पोलीसांनी तसे का नमुद केला आहे, याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष आरोपी वासुदेव डाबेराव याच्या ताब्यातुन व राहते घरामधुन एका प्लास्टीक कॅनमध्ये १० लिटर गावठी हातभट्टीची दारु जप्त केली व त्याचा पंचनामा केला असे काही घडले नाही. मी आरोपीला

ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी. पी. उपर्वट यांनी उलटतपास नाकारला.**

फेरतपास नाही.

**दिनांकः– १२.०५.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.05.12 16:22:24 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | ए.एस.गवळी |
| घोषित दिनांक | :– | १२/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | १२/०५/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | १२/०५/२०२६ |